# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र




०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ६१७ /पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- २२/११/२०१८

## जनावरांची अवैध वाहतुक करणारा ट्रक पकडला, ३३,२१,०००/— रूपयाचा मुद्द्‌माल जप्त, ३ आरोपी अटकेत

**पोलीस ठाणे कारधा** :—दिनांक २१/११/२०१८ रोजी पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहू, अपर पोलीस अधीक्षक रश्मी नांदेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन कारधा ठाणेदार श्री.जी.आर.कंकाळे व पोलीस निरीक्षक आर.एम.मानकर स्था.गु.शा.भंडारा, सहायक पोलीस निरीक्षक पोटे, सहायक फौजदार राहांगडाले, पोलीस हवालदार मोहरकर, साकुरे, रामटेके, पोलीस शिपाई कडव पो.नी.स्थागुशा, व पोलीस स्टेशन कारधा येथिल कर्मचारी यांनी वेळीच सर्तकता दाखवुन शिताफिने कारधा टि.पांईट येथुन एनएच ६ रोड जाणा—या कंटेनर क्रमांक यु.पी.१४ एफ.आय ९७२५ मध्ये अवैधरित्या जनावरांना कोंबुन क्रूरतेने वागवुन वाहतुक करणारे १ कंटेनर वाहण पकडले.

सदर कंटेनर वाहण क्र यु.पी.१४ एफ.आय ९७२५ मध्ये एकुण २२ जनावरे दाटीवाटीने कोंबुन अपुऱ्या जागेत जनावरांना त्रास होईल अशा स्थितीत वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने त्याचेकडून २२ जनावरे किंमती अंदाजे ३,२१,०००/—रु. व कंटेनर वाहण किंमती अंदाजे ३०,००,०००/—रु. असे एकुण ३३,२१,०००/—रु. चे वाहन व जनावरे चा माल मिळुन आल्याने आरोपी क्र. १) मुजीब मन्नी काजी वय २८ वर्ष २) जफर मंजुर काजी वय ४० वर्ष दोन्ही रा.धोंडराई ता. गेवराई जि. बिड ३) लेबर संदिप कपुरचंद मोहबे वय २२ वर्ष रा.कुंभार टोली आमगाव जि.गोंदिया आरोपींतान विरूध्द पोलीस ठाणे कारधा येथे कलम ११(१) (ड)पशुंना क्रुरतेची वागनुक देणारा कायदा १९६० अन्वये गुन्हा नोंद केला असुन सर्व गोधन सुकृत गौशाळा खैरी पिंपळगाव येथील गोशाळेत ठेवण्यात आले आहेत. सदर गुन्हयातिल आरोपीतांना अटक करण्यात आले आहे. गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार सोमेश्वर सेलोकर पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता